सायबर शिक्षणातून विद्यार्थिनींना सुरक्षेचे धडे



क्विक हील फाउंडेशनच्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' उपक्रमांतर्गत गव्हर्नमेंट इन्स्टिट्यूट ऑफ फॉरेन्सिक सायन्स, नागपूरच्या सहकार्याने दक्षिण-पूर्व-मध्य रेल्वे, नागपूर येथे सायबर जनजागृती कार्यक्रम झाला. संस्थेचे विद्यार्थी अर्श कवरे आणि देवाशीष पांडे यांनी उपस्थितांना सायबर सुरक्षेबाबत माहिती दिली. व्हॉइस फिशिंग, एसएमएस व ई-मेल फिशिंग, बनावट केवायसी अपडेट, क्यूआर कोड व यूपीआय फसवणूक, ऑनलाइन शॉपिंग फ्रॉड, सोशल मीडिया हॅकिंग, बनावट गुंतवणूक व नोकरीच्या आमिषाने होणारी फसवणूक, ओटीपी शेअरिंगचे धोके तसेच मॉडिफाइड ॲप्स आणि सायबर बुलिंग याबाबत माहिती देण्यात आली. सायबर फसवणूक झाल्यास १९३० हेल्पलाइन किंवा राष्ट्रीय सायबर गुन्हे अहवाल पोर्टलवर तक्रार नोंदविण्याची माहितीही दिली.